(4)

# ई- निविदा सुचना

## सूचना क्र. २८ सन २०२२-२३

### ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

कार्यकारी अभियंता, **ग्रामीण पाणीपुरवठा** विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी कडील खालील कामांची ई निविदा योग्य त्या वर्गातील जिल्हा परिषद कडील /एमजीपी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागविणेत येत आहेत. सदर ई निविदेबाबतची तपशीलवार माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | निविदा रक्कम | इसारा रक्कम | को-या निविदा पत्रकाची किंमत | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग | ई-निविदा डाऊन लोड करणेचा कालावधी दिनांक व वेळ | ई निविदा सादर करणेचा कालावधी तारीख व वेळ | ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडणेची तारीख व वेळ | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **खुली निविदा** | | | | | | | | | | |
| 1 | मौजे पोमेंडी खुर्द येथे सुधारात्मक पुर्नजोडणी करणे ता.रत्नागिरी | जल जिवन मिशन | **4740688/-** | **47406/-** | 1000/- नापरतावा | वर्ग- ५ व त्यावरील | दि. 26.7.2022 10.00 ते दि. 01.08.2022 17.00 | दि. 26.7.2022 10.00 ते दि. 01.08.2022 17.00 | दि. 03.08.2022 10.00 वा. | 6 महिने पा.व. |
| 2 | मौजे तुळशी येथे सुधारात्मक पुर्नजोडणी करणे ता.मंडणगड | जल जिवन मिशन | **2551307/-** | **25513/-** | 1000/- नापरतावा | वर्ग- ५ अ व त्यावरील | दि. 26.7.2022 10.00 ते दि. 01.08.2022 17.00 | दि. 26.7.2022 10.00 ते दि. 01.08.2022 17.00 | दि. 03.08.2022 10.00 वा. | 6 महिने पा.व. |

## निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) संपूर्ण ई निविदा प्रक्रिया ऑनलाईन स्वरूपाची असेल, निविदेसंदर्भातील सूचना, प्रसिध्दी, शुध्दीपत्रके इत्यादी माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील.

२) वरील कामांची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे ई निविदा उपरोक्त दिनांका पर्यंत अधिग्रहित (download) करता येतील.

३) वरील कामांची निविदा या संकेतस्थळावर उपरोक्त दिनांकापर्यंत फक्त इलेक्ट्रॉनिक फॉरमॅट मध्ये ऑनलाईन स्वरूपात सादर करावी.

४) ई निविदेसोबत तांत्रिक लखोटयामध्ये जोडावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे रहातील (अधिक माहिती करीता इंग्रजी निविदा सूचना व बी वन निविदा पहावी)

अ) Registration and Qualification Documents :- यात मक्तेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राहय असणे आवश्यक आहे,GSTR-३B दाखला मार्च-२०२२ जीएसटी नोंदणी दाखला पॅन कार्ड,इनकम टॅस प्रमाणपत्र २०१९-२०२०,२०२०-२०२१, व २०२१-२०२२ , प्रोफेशनल टॅक्स डिक्लेरेशन, मक्तेदाराची विहीत नमुन्यातील माहिती (Details of Contractor), निविदा फॉर्म फी भरणा त्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

५) निविदाकाराने त्यांच्या स्वत:च्या फर्मच्या नावे असलेल्या बँकेच्या खाते क्रमांकावरुन Internet banking द्वारा निविदा फॉर्म फीची रक्कम व इसारा रक्कम वर्ग करणे बंधनकारक आहे. तसे न आढळल्यास निविदा नाकारण्यात येईल.

६) निविदाकाराने कार्यालयाकडून अपलोड केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले आहे व त्या मधील सर्व अटीशर्ती निविदाकारास मान्य आहे असे समजून त्याने निविदा सादर केलेली आहे असे समजण्यात येईल. निविदाकाराने Details of Bidders मध्ये सर्व माहिती नमुद करुन त्याची Scan PDF प्रत लिफाफा क्रमांक मध्ये अपलोड करावी.

७) निविदा सादरीकरण/स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच करणेतील येतील.**डी.डी.स्कॅन करुन अपलोड करणे व त्याची प्रत ही कार्यालयात सादर करणे पध्दत बंद करण्यात आलेली आहे याची निविदाकारांनी नोंद घ्यावी.** निविदाद्वारे कोणतेही मूळ कागदपत्रे प्रमाणपत्रे जमा करण्यासाठी कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. तथापि न्युनतम देकार निविदाकाराला Financial Bid Opening नंतर निविदा स्विकृतीपूर्वी सर्व Upload केलेली कागदपत्रे मूळ कागदपत्रांबरोबर **सहायक लेखाधिकारी ग्रापापु विभाग रत्नागिरी** यांचे कडून पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील तसेच Bid Submission Confirmation receipt/Payment Transaction Receipt ची छायांकित प्रत कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील, **कुठलेही कारण न दर्शविता ऑनलाई निविदा स्विकारणेचा व नाकारणेचा अधिकार कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी राखुन ठेवत आहे. संबधित मक्तेदार यांनी**

८) ५० लक्षच्या वरिल कामांसाठी निविदा किमंतीच्या किमान ५०% रक्कमेचे पाणी पुरवठा विभागाचे एक काम पूर्ण केल्याचा काम पूर्णत्वाचा दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.

९) ५० लक्ष वरिल योजनेसाठी आवश्यक असणारी जेसीबी, ब्रेकर, इलेक्ट्रीक प्युजन वेलडींग मशीन व इतर यंत्रसामुग्री स्वत:चे मालकीचे किंवा भाडेतत्वावर घेतलेबाबत नोटरी केलेले कागदपत्र असणे आवश्यक आहे.

१०) सदर कामाचे देयक निधीच्याउपलब्धतेनुसार करण्यात येईल.

११) दि.१.०७.२०१७ पासून जीएसटी करप्रणाली शासनाने लागू केलेली असल्याने मक्तेदाराने दरपत्रक भरताना जीएसटीचा विचार करूनच दरपत्रक भरावे

**१२) निविदे सोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबत शपथपत्र रक्कम रुपये ५००/- च्या स्टॅम्पपेपवरसोबत दिलेल्या विहीत नमुन्यात सत्यप्रतिज्ञापत्र Affidavit स्वत: स्वाक्षरी करुन कामनिहाय स्वंतत्र अपलोड करणे बंधनकारक राहील. स्टॅम्प पेपरवरील सत्यप्रतिज्ञापत्राची मुळ प्रत करारनाम्यासोबत जमा करणे बंधनकारक राहील.**

१३) शासन निर्णय दिनांक ५/१०/२०१८ अन्वये कार्यारंभ प्राप्त होताच कामाचा विमा शासकिय विमा निधी कार्यालयाकडे काढणे अनिवार्य आहे.

१४) जल जीवन मिशन अंतर्गत योजना कार्यान्वित झाल्यानंतर नळजोडणी नसलेल्या उर्वरित सर्व घरांना योजनेतील वितरण व्यवस्थेमधून नळजोडणी देणे हे अंतिम उदिष्ट असल्याने संबधित निविदाधारकास ग्रामपंचायतीकडून उर्वरित नळजोडणी देणे बंधनकारक राहील. सर्व नळजोडणी दिल्यानंतर केंद्रशासनाच्या संकेतस्थळावर ग्रामपंचायती मार्फत १००% नोंदी घेतल्यानंतरच संबंधित निविदाधारकाचे अंतिम देयक अदा करणेत येईल. यास्तव अंतिम देयका सोबत १००% नळजोडणी झाल्याचे व IMIS वर नोंदी घेतलेचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१५) योजनेच्या प्रशासकिय मान्यतेच्या अटी व शर्ती लागू राहतील.

१६) सार्वजनिक बांधकाम विभाग ,शासन निर्णय तसेच राज्य व पाणी स्वच्छता मिशन यांचे मार्फत येणारे
शासन निर्णय व परिपत्रक व शासन निर्णयातील निविदेच्या अटी व शर्ती लागू राहतील.

१७) **प्रस्तुत कामाचा दोष दायित्व कालावधी कामपूर्ण झालेचे दिनांकापासून एक वर्षापर्यंत राहिल**

१८) मक्तेदार काळया यादीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

१९) निविदा प्रक्रिये मध्ये मक्तेदार यांच्या काही हरकती असल्यास निविदा (तांत्रिक लखोटा) ओपन केल्यावर दोन दिवसात घेण्यात यावी त्यानंतर कुठल्याही प्रकारचा विचार केला जाणार नाही यांची संबधित मक्तेदार यांनी नोंद घ्यावी.

सही/-

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

जा.क्र.रजिप/ग्रापापु/टेंडर/खुली निविदा /२०२२-२३
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जि.प.रत्नागिरी, दि. २६/७/२०२२**